## PRESS NOTE

**Sub: Special drive after completion of Special Intensive Revision (SIR)**

1. Commission has instructed to undertake a **special drive for enrolment of left-out and first time/young electors.**

2. Under the process of Special Intensive Revision, in the enumeration phase, a list of Absent, Shifted, Dead and Duplicate (ASDD) voters was prepared by each Booth Level Officer (BLO), with the probable reason for non-inclusion of their names. This list was displayed at notice board of respective Panchayat Bhawans/Urban Local bodies and offices of the BDOs/Panchayat officers/ULB officers, shared with the BLAs and with the political parties and also uploaded on the CEO website. Thereafter, the draft was published and shared with the political parties and also uploaded on the CEO website. The final electoral roll was published after decision on the claims and objections by the EROs and includes the list of electors that were added or deleted after the draft publication. As compared to the pre-SIR Electoral roll, the electoral roll after final publication incorporates deletions during enumeration phase and additions and deletions after the draft roll publication.

3. **Voter enrolment is a continuous process and any person not yet enrolled in the electoral roll or whose name has got deleted can apply for enrolment at any point of time.** The objective of the special drive is to identify and facilitate such electors.

4. During this special drive, the Chief Electoral Officers (CEOs), District Election Officers (DEOs), Electoral Registration Officers (EROs) have been directed to ensure the following:

i.) BLOs shall compare the current electoral roll with the pre-SIR electoral roll and identify such electors whose names were there in the pre-SIR roll but who are not included in the current electoral roll and prepare a list of such electors.

ii.) BLOs shall undertake House-to-House (H2H) visits in respect of such identified electors to ascertain their present status and facilitate enrolment through Form 6, wherever the person is found to be eligible. The BLOs may cover at least 20-25 electors in a week so as to complete this exercise within a period of about one month. They shall also indicate the present status of each such elector in the list prepared by them. The electors for whom Form 6 has been filled up will also be indicated.

iii.) BLOs will also ensure filling up of Form 6 for enrolment of any left out/first time/young electors during their house to house visits.

iv.) BLOs will share this list with the BLAs of the recognised political parties.

v.) BLOs will share the list with the ERO alongwith the filled in application forms in Form 6 and their field verification report. ERO is the competent authority to act as deemed fit on these cases as per the provisions under The Representation of The People Act, 1950 and Registration of Electors Rules 1960.

vi.) At the end of this exercise, the booth wise lists prepared as above will also be shared by the EROs with the representatives of the political parties giving them a further opportunity to enable enrolment of any left-out electors.

vii.) Besides the above, Booth Level Camps will be organised to facilitate submission of applications for enrolment. Special camps will also be organised for enrolment of people living in night shelters, labour colonies as well as for homeless and marginalised person.

5. CEOs, DEOs and EROs will undertake appropriate awareness and mobilisation activities through educational institutions, local-level outreach, SVEEP activities, regular press briefings and other suitable platforms to ensure that every eligible citizen is made aware of the opportunity to get enrolled.

6. The progress and regular review of the drive will be closely monitored at the level of CEO, DEO and ERO.

7. Necessary instructions have been issued to all concerned DEOs, EROs and BLOs for effective implementation of the above directions and to ensure that the special drive reaches all eligible citizens.

# प्रसिद्धी पत्रक

## विशयः खास सखोल पुनरावृत्ती (एसआयआर) पुराय जाले उपरांतची खास मोहीम

1. आयोगान उरिल्ल्या मतदारांची आनी पयले खेपे मतदान करपी/युवा मतदारांची नोंदणी करपा खातीर खाशेली मोहीम चलोवपाचो आदेश दिला.

2. खाशेले सखोल पुनरावृत्तीचे प्रक्रिये खाला, गणना टप्प्यांत, दरेकी बूथ पांवड्या वयल्या अधिकाऱ्यान (BLO) अनुपस्थित, स्थलांतरीत, मरण आयिल्ले आनी डुप्लिकेट (एएसडीडी) मतदारांची वळेरी तांच्या नांवांचो आसपाव ना करपाचें संभाव्य कारणा सयत तयार केल्ली. ही वळेरी संबंदीत पंचायत भवन/शारी थळाव्या संस्थांच्या आनी बीडीओ/पंचायत अधिकारी/यूएलबी अधिकाऱ्यांच्या कार्यालयांच्या नोटीस बोर्डाचेर प्रदर्शीत केल्ली, BLA क आनी राजकीय पक्षांक दिली आनी CEO च्या वॅबसायटीचेरूय अपलोड केली. उपरांत, मसुदो प्रकाशीत करून, राजकीय पक्षांक दिलो आनी CEO च्या वॅबसायटीचेरूय अपलोड केलो. ERO च्या दाव्यांचेर आनी आक्षेपांचेर निर्णय घेतल्या उपरांत निमाणी मतदार वळेरी प्रकाशीत केली आनी मसुदो प्रकाशीत जाल्या उपरांत आसपावीत केल्ल्या वा वगळायिल्ल्या मतदार वळेरीचो आसपाव तातूंत केलो. SIR पूर्व मतदार वळेरीचे तुलनेंत, निमाण्या प्रकाशना उपरांतचे मतदार वळेरींत गणनेच्या टप्प्यांत वगळायिल्लीं नांवां आनी मसुदो प्रकाशीत जाल्या उपरांतची जोडणी आनी वगळायिल्ल्या नांवांचो आसपाव आसा.

3. मतदार नोंदणी ही एक सततची प्रक्रिया आसा आनी आजून मतदार वळेरींत नोंदणी नाशिल्लो वा जाचें नांव वगळायलां तो खंयच्याय वेळार नोंदणी खातीर अर्ज करूंक शकता. अशा मतदारांक वळखप आनी सुविधा दिवप हो ह्या खाशेल्या मोहिमेचो हेतू आसा.

4. हे खाशेले मोहिमे वेळार, मुखेल वेंचणूक अधिकारी (CEOs), जिल्लो वेंचणूक अधिकारी (DEOs), वेंचणूक नोंदणी अधिकारी (EROs) हांकां सकयल दिल्ले मुद्दे सुनिश्चीत करपाचे निर्देश दिल्यात:

i.) BLO, सध्याचे वेंचणूक वळेरेची तुळा SIR पूर्व वेंचणूक वळेरे कडेन करतले आनी SIR पूर्व वेंचणुकेचे वळेरेंत नांवां आशिल्ल्या, पूण सध्याचे वेंचणूक वळेरेंत आसपाव नाशिल्ल्या अशा मतदारांक सोदून काडटले आनी अशा मतदारांची वळेरी तयार करतले.

ii.) अशा सोदून काडिल्ल्या मतदारांच्या संदर्भांत, BLO घरां-घरांत (H2H) भेट दिवन तांची सध्याची स्थिती सोदून काडटले आनी जर ती व्यक्ती पात्र थारता जाल्यार फॉर्म 6 वरवीं नोंदणी करपाक सुविधा दितले. सुमार एका म्हयन्याच्या काळांत हे काम पुराय करपा खातीर BLO एका सप्तकांत उण्यांत उणे 20-25 मतदारांक आसपावीत करूंक शकतात. तशेंच तांणी तयार केल्ले वळेरेंत अशा दरेका मतदाराची सध्याची स्थिती दाखोवची. ज्या मतदारांक फॉर्म 6 भरला तांकांय निर्देशीत करतले.

iii.) तशेंच खंयच्याय उरिल्ल्या मतदारांची/पयलेच खेपे मतदान करपी/युवा मतदारांची घराघरांत भेट घेवपा वेळार नोंदणी करपा खातीर BLO, फॉर्म 6 भरपाची खात्री करतले.

iv.) BLO ही वळेरी मान्यताय मेळिल्ल्या राजकीय पक्षांच्या BLO क दितले.

v.) BLO फॉर्म 6 त भरील्ले अर्ज फॉर्म आनी तांच्या क्षेत्रीय पडताळणी अहवाला सयत वळेरी ERO कडेन दितले. लोक प्रतिनिधीत्व अधिनेम, 1950 आनी मतदार नोंदणी नेम, 1960 ह्या तरतुदीं प्रमाणें ह्या प्रकरणांचेर योग्य ती कारवाय करपाक ERO हे सक्षम प्राधिकारीणी आसात.

vi.) हे प्रक्रियेचे शेवटाक, वयर दिल्ले प्रमाणें तयार केल्ली बूथवार वळेरीय ERO राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीं कडेन दितले, जाका लागून तांकां उरिल्ल्या खंयच्याय मतदारांची नोंदणी करपाक सक्षम जावपाची आनीक एक संद मेळटली.

(vii) वयल्या गजालीं वांगडाच, नांव नोंदणी खातीर अर्ज सादर करपा खातीर बूथ पांवड्या वयली शिबिरां आयोजीत करतले. तशेंच नायट शेल्टर, कामगार वसाहती तशेंच बेघर आनी उपेक्षीत व्यक्ती खातीर खाशेलीं शिबिरां आयोजीत करतले.

5. दरेका पात्र नागरिकांक आपलें नांव नोंद करपाची संद मेळ्ळया हाची खात्री करपा खातीर CEO, DEO आनी ERO शिक्षणीक संस्था, थळावी प्रसार मोहीम, स्वीप उपक्रम, नेमान पत्रकार परिशद आनी हेर योग्य प्लॅटफॉर्मां वरवीं जागृताय आनी एकत्रीकरणाच्यो कार्यावळी घडोवन हाडटले.

6. ह्या मोहिमेची प्रगती आनी ताचो नेमान नियाळ हाचेर CEO, DEO आनी ERO बारीक नदर दवरतले.

7. सगळ्या संबंदीत DEO, ERO आनी BLO हांकां वयले निर्देश प्रभावीपणान चालीक लावपाची खात्री करपा खातीर आनी खाशेली मोहीम पात्र आशिल्ल्या दरेकल्या मेरेन पावची हाची खात्री करपा खातीर आवश्यक सुचोवण्यो दिल्यात.

**प्रसिद्धी पत्रक**

**विषय : विशेष गहन पुनरीक्षण (एसआयआर) पूर्ण झाल्यानंतर विशेष मोहीम**

1. आयोगाने **मतदार यादीत समाविष्ट होण्यापासून राहून गेलेल्या, तसेच प्रथमच मतदार म्हणून नोंदणीस पात्र असलेल्या/युवा मतदारांच्या नोंदणीसाठी विशेष मोहीम** राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

2. विशेष गहन पुनरीक्षणाच्या प्रक्रियेदरम्यान, गणना टप्प्यात, प्रत्येक बूथ स्तरीय अधिकाऱ्याद्वारे (बीएलओ) अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार अशा मतदारांची नावे यादीत समाविष्ट न करण्याचे संभाव्य कारण नमूद करून, मतदार यादी तयार करण्यात आली होती. ही यादी संबंधित पंचायत भवन/नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सूचना फलकावर, तसेच बीडीओ/पंचायत अधिकारी/यूएलबी अधिकारी यांच्या कार्यालयांमध्ये प्रदर्शित करण्यात आली होती. ही यादी बीएलए यांच्यासोबत, तसेच राजकीय पक्षांसोबत सामायिक करण्यात आली होती आणि सीईओच्या संकेतस्थळावरही अपलोड करण्यात आली होती. त्यानंतर, मसुदा मतदार यादी प्रकाशित करण्यात आली आणि ती राजकीय पक्षांसोबत सामायिक करण्यात आली, तसेच सीईओच्या संकेतस्थळावरही अपलोड करण्यात आली. ईआरओ यांनी दाव्यांवर आणि हरकतींवर निर्णय घेतल्यानंतर, अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्यात आली. त्यामध्ये, मसुदा मतदार यादीच्या प्रकाशनानंतर समाविष्ट किंवा वगळण्यात आलेल्या मतदारांची यादी समाविष्ट आहे. एसआयआर-पूर्व मतदार यादीच्या तुलनेत, अंतिमरित्या प्रकाशित करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये, गणना टप्प्यात करण्यात आलेल्या वगळण्या, तसेच मसुदा मतदार यादीच्या प्रकाशनानंतर करण्यात आलेली समावेशने व वगळण्या समाविष्ट आहेत.

**3. मतदार नोंदणी ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि ज्या कोणत्याही व्यक्तीचे नाव अद्याप मतदार यादीत नोंदविण्यात आलेले नाही किंवा ज्या व्यक्तीचे नाव मतदार यादीतून**

वगळण्यात आले आहे, ती व्यक्ती कोणत्याही वेळी मतदार म्हणून नोंदणीसाठी अर्ज करू शकते. अशा मतदारांची ओळख पटविणे आणि त्यांना नोंदणीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, हा विशेष मोहिमेचा उद्देश आहे.

4. या विशेष मोहिमेदरम्यान, मुख्य निवडणूक अधिकारी (सीईओ), जिल्हा निवडणूक अधिकारी (डीईओ), मतदार नोंदणी अधिकारी (ईआरओ) यांना पुढील बाबी सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत:

i.) बीएलओ यांनी सध्याच्या मतदार यादीची एसआयआर-पूर्व मतदार यादीशी तुलना करून, एसआयआर-पूर्व मतदार यादीमध्ये ज्या मतदारांची नावे होती, परंतु सध्याच्या मतदार यादीमध्ये त्यांची नावे समाविष्ट नाहीत, अशा मतदारांची ओळख पटवावी आणि अशा मतदारांची यादी तयार करावी.

ii.) अशा प्रकारे ओळख पटविण्यात आलेल्या मतदारांच्या बाबतीत, बीएलओ यांनी घरोघरी भेटी देऊन, त्यांची सद्यस्थिती जाणून घ्यावी आणि संबंधित व्यक्ती मतदार म्हणून नोंदणीस पात्र असल्याचे आढळल्यास, नमुना 6 द्वारे नोंदणी करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्यावी. हे काम सुमारे एका महिन्याच्या कालावधीत पूर्ण करता यावे, यासाठी बीएलओ यांनी दर आठवड्याला किमान 20-25 मतदारांची भेट घ्यावी. त्यांनी तयार केलेल्या यादीमध्ये प्रत्येक अशा मतदाराची सद्यस्थितीही नमूद करावी. ज्या मतदारांसाठी नमुना 6 भरून घेण्यात आला आहे, त्यांचाही उल्लेख करण्यात यावा.

iii.) बीएलओ यांनी घरोघरी भेटी देताना, मतदार यादीत समाविष्ट होण्यापासून राहून गेलेल्या/प्रथमच मतदार म्हणून नोंदणीस पात्र असलेल्या/युवा मतदारांच्या नोंदणीसाठी नमुना 6 भरून घेणे हे देखील सुनिश्चित करावे.

iv.) बीएलओ यांनी ही यादी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या बीएलए यांच्यासोबत सामायिक करावी.

v.) बीएलओ यांनी ही यादी, नमुना 6 मधील भरलेले अर्ज आणि त्यांचा क्षेत्रीय पडताळणी अहवाल यांसह, ईआरओ यांच्यासोबत सामायिक करावी. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, 1950 आणि मतदार नोंदणी नियम, 1960 यांमधील तरतुदींनुसार, या प्रकरणांमध्ये योग्य ती कार्यवाही करण्यासाठी ईआरओ हे सक्षम प्राधिकारी आहेत.

vi.) या मोहिमेच्या शेवटी, वरीलप्रमाणे तयार करण्यात आलेल्या मतदान केंद्रनिहाय याद्या, ईआरओ यांनी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबतही सामायिक कराव्यात, जेणेकरून मतदार यादीत समाविष्ट होण्यापासून राहून गेलेल्या कोणत्याही मतदाराची नोंदणी करण्यासाठी, त्यांना पुढील संधी उपलब्ध होईल.

vii.) वरील बाबींव्यतिरिक्त, नोंदणीसाठी अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, बूथ स्तरीय शिबिरांचे आयोजन करण्यात येईल. रात्रीच्या निवारा केंद्रांमध्ये राहणाऱ्या व्यक्ती, कामगार वसाहतींमध्ये राहणाऱ्या व्यक्ती तसेच बेघर आणि वंचित व्यक्ती यांच्या नोंदणीसाठी विशेष शिबिरांचेही आयोजन करण्यात येईल.

5. प्रत्येक पात्र नागरिकाला मतदार म्हणून नोंदणी करून घेण्याच्या संधीची माहिती होईल, हे सुनिश्चित करण्यासाठी सीईओ, डीईओ आणि ईआरओ यांनी शैक्षणिक संस्था, स्थानिक पातळीवरील जनसंपर्क, SVEEP उपक्रम, नियमित पत्रकार परिषदा, तसेच इतर योग्य माध्यमांद्वारे आवश्यक जनजागृती आणि जनसहभागविषयक उपक्रम राबविले जातील.

6. या मोहिमेच्या प्रगतीचे आणि नियमित पुनरावलोकनाचे सीईओ, डीईओ आणि ईआरओ यांच्या स्तरावर बारकाईने निरीक्षण करण्यात येईल.

7. वरील निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, तसेच ही विशेष मोहीम सर्व पात्र नागरिकांपर्यंत पोहोचेल हे सुनिश्चित करण्यासाठी, संबंधित सर्व डीईओ, ईआरओ आणि बीएलओ यांना आवश्यक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.